जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५ दिनांक - २०/०१/२०२५**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## ट्रिनिटी कॉलेज बोपदेव घाट परिसरात गुन्हेगारी वर्चस्व प्रस्थापीत करण्याच्या उद्देशाने दहशत माजविणा-या ७ आरोपींना पकडुन त्यांच्याकडुन ०४ धारदार शस्त्रे जप्त.

दि.१६/०१/२०२५ रोजी ट्रिनिटी कॉलेज बोपदेव घाट येथे कॉलेज बाहेरील सार्वजनीक रोडवर काही मुलांमध्ये वाद व भांडणे झाली होती त्यात फिर्यादी नामे विश्वजीत बाबाजी हुलवळे वय १९ वर्षे रा. सध्या येवलेवाडी, कोंढवा बुाा यास कोयत्याने मारहाण करून जबर दुखापत केल्याने फिर्यादीने फिर्याद दिल्यावरून कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्र ४६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९,१८९(२), १८९(४) ,१९० ,१९१ (२), १९१(३) सह आर्म ॲक्ट ४/२५ मपोका ३७(१)(३),१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनय पाटणकर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री.अब्दुल रौफ शेख, व श्री.सुरज बेंद्रे यांनी कोंढवा पोलीस स्टेशनकडील तपास पथकाला वरील गंभीर दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते.

त्या संदर्भाने कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत दि. १८/०१/२०२४ रोजी सायंकाळी पेट्रोलींग करीत असताना तपास पथकातील पोलीस हवालदार सतिश चव्हाण व विशाल मेमाणे यांना त्यांच्या गोपनिय बातमीदारांमार्फत सदर गुन्ह्यातील आरोपी हे आरोपी नामे राज रोंगे, याच्या येवलेवाडी येथील सिंगापुर होम्स, येथील फ्लॅट नं ३०१, मध्ये लपले आहेत अशी बातमी मिळाल्याने कोंढवा तपास पथकातील स्टाफच्या मदतीने तेथे जाऊन वरील गुन्ह्यातील पाहीजे आरोपी नामे १) भावेश बाळासाहेब कुंजीर, वय २३ वर्षे, रा. हिवरकर मळा, सह्याद्री सोसायटी, इंडियन ऑईल पेट्रोल पंपा समोर, सासवड, पुणे., २) अथर्व कैलास पवार, वय २१ वर्षे, रा. स.नं. ५४/सी/१, ओम सोसायटी, बी.टी. कवडे रोड, दळवी नगर, घोरपडी, पुणे., ३) सुरज सचिन राऊत, वय २१ वर्षे, रा. द लेक डिस्टीक सोसायटी, सासवड-बोपदेव घाट रोड, येवलेवाडी, पुणे., ४) आर्यन विलास पवार, वय १८ वर्षे, रा. स.नं. ५४/सी/१, ओम सोसायटी, बी.टी. कवडे रोड, दळवी नगर, घोरपडी, पुणे., ५) सौरभ प्रदिप लोंढे, वय १८ वर्षे रा. संदेश सहकारी सोसायटी, फ्लॅट नं ५०३, संभाजीनगर, धनकवडी, पुणे मुळ रा. मु.पो. सातेफळ, सौंदना (ढोकी), ता. कळंब, जि. धाराशिव., ६) राज दिगंबर रोंगे, वय १९ वर्षे, रा.

सिंगापुर होम्स, तिसरा मजला, फ्लॅट नं ३०१, विठ्ठल मंदिर समोर, येवलेवाडी, कोंढवा बु., पुणे (मुळ रा. मु.पो. खर्डी, ता. पंढरपुर, जि. सोलापूर.), व ७) वरून बबन भोसले, वय २१ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. आनंदनगर, जेजुरी, ता. पुरंदर जि. पुणे. यांना ताब्यात घेवुन गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे यांनी सदर गुन्ह्यात अटक करून सदर आरोपी यांना मा.न्यायालय समक्ष हजर करून त्यांची पोलीस रिमांड घेवुन त्यांचेकडुन गुन्ह्यात वापरलेली धारदार शस्त्रे व वाहने असा एकुण ३,८०,०००/- रू किं चा मुद्देमाल गुन्ह्याच्या अनुषगांने जप्त केला आहे. त्यांच्याकडे सदर गुन्ह्यात त्यांचे आणखी साथीदार असल्याबाबत अधिक तपास करीत आहोत.

वरील नमुद कारवाई ही  मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री मनोज पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-५, श्री ड़ॉ.राजकुमार शिंदे,मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग, श्री धन्यकुमार गोडसे, कोंढवा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनय पाटणकर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री अब्दुल रौफ शेख, श्री सुरज बेंद्रे, यांचे मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे, पोलीस हवालदार अमोल हिरवे, सतिश चव्हाण, निलेश देसाई, विशाल मेमाणे, गोरखनाथ चिनके पोलीस अंमलदार संतोष बनसुडे, लक्ष्मण होळकर, शाहिद शेख, सुरज शुक्ला, सागर भोसले, सुजित मदन, राहुल थोरात यांच्या पथकाने केली आहे.

